# वारकरी संतांचे सामाजिक कार्यः एक अभ्यास

**देशमुख सचिन**

**प्रास्ताविक :**

आपल्या देशात संतांना गुरू मानण्याची परंपरा आहे. गुरूचे महत्त्व आपल्या सर्वांना माहीतच आहे. संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ आणि समर्थ रामदास हे मराठी संत महाराष्ट्राचे प्रणेते आणि महाराष्ट्रधर्माचे संत होते. त्यांच्यामुळे आध्यात्मिक समता घडली. माणूस उभा राहिला तरच देश उभारेल, हे जाणून संतांनी जागृतीचे काम केले. संतश्रेष्ट ज्ञानेश्वरांचे समाधीस्थळ म्हणून आळंदी प्रसिद्ध आहे. याला देवाची आळंदी असेही म्हणतात. मध्ययुगात महाराष्ट्रातील धार्मिक व सामाजिक जीवन अध:पतित होत चालले होते. वैदिक धर्माच्या उज्वल परंपरेत कर्मठता व पढिक पांडित्य यांनी व्यक्तिचे जीवन नकोसे करुन टाकले होते. स्वत:ला पंडित समजून घेणारे वैदिक पंडित यज्ञ आणि वेद मंत्राचे दुरुपयोग करीत होते व स्वार्थ साधूपणा करीत होते. अज्ञान, भिती यामुळे सामान्य लोक जाखाई, जोखाई या देवतेकडे आकर्षित होऊ लागले होते. मग त्यातच जादूटोणा, भूतबाधा, जागरण मारण, मंत्रतंत्र यांच्या जोखडात अडकली जात होती. अशाच परिस्थितीत वैदिक धर्माविरुध्द बंड पूकारुन काही संप्रदाय उदयास आले.

**वारकरी संप्रदायाचे स्वरुप :-**

वारकरी पंथाचे आराध्य दैवत हे पंढरपूर येथिल श्री विठ्ठल हे होत, म्हणून वारकरी वारिला जात असतांना म्हणत असत की, 'पाऊले चालती पंढरीची वाट' अशा प्रकारे विठ्ठलाच्या ओढीने सर्व भाविक हे आषाढी, कार्तिकेला पंढरपूर येथे वारीला जातात. तेथे हरिचा गजर करत विठ्ठलाच्या सावळ्या रुपाचे दर्शन घेतात. विठ्ठल हा वैष्णव पंथीय असल्यामुळे तो विष्णूचा अवतार मानला जातो. पंढरपुरच्या विठ्ठल मंदिराला चौ-यांशीची शीळा म्हणून ओळखले जाते. याबाबत डॉ. दादा गोरे म्हणतात की, ''या शिळेस पाठ लावली म्हणजे मनुष्याच्या चौ-यांशी योनीतून मुक्तता होते अशी समजूत आहे'' यावरुन असे वाटते की विठ्ठल मंदिराचे महात्म किती थोर आहे हे त्यांनी सुचित केले आहे असे वाटते. म्हणून सर्व भाविक आनंदाने, भक्तिभावाने पंढरपूरच्या यात्रेला जातात. वारकरी संप्रदायाचे आद्य प्रर्वतक म्हणून संत ज्ञानेश्वर व संत नामदेव यांना मानले जाते

**<u>वारकरी संत</u>**

**<u>संत नामदेव :-</u>**

भागवत धर्माची पताका संपूर्ण देशात फडकविणार्या संत नामदेवांच्या कर्मभूमीत अर्थात घुमानमध्ये यंदाचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साजरे झाले. या निमित्ताने पंजाबने नामदेवांवर महाराष्ट्रापेक्षा काकणभर अधिक केलेले प्रेम पाहावास मिळणार असल्यामुळे साहित्य संमेलनापेक्षा हा आनंद साहित्यांना भारावून टाकेल. संत नामदेवाची अभंगवाणी साधी, सरळ व प्रेमळ असून अनुभव संपन्न आहे असे वाटते. याबाबत डॉ. सदाशिव सरकटे असे म्हणतात की, ''भक्तीचा मळा फुलवणारे संत नामदेवाचे अभंग केवळ मराठी मनातच नव्हे तर ते मराठी मुलुखाच्याही बाहेर प्रवास करत आहे'' भावगत धर्माचा प्रसार व प्रचार त्यांनी आपल्या वाणीने पंजाब पर्यत केला होता. 'गुरु ग्रंथ साहेबा' या ग्रंथात संत नामदेवाच्या अभंगाला 'नामयाची मुखबाणी' असे ही म्हटले आहे.

संत नामदेवांनी संत ज्ञानेश्वरांचे चरित्र लिहिले, त्यांनी आदी, तीर्थवळी व समाधी अशा तीन प्रकरणांतून ते रेखाटले आहे.

**संत गोरा कुंभार :-**

संत गोरोबा हे उस्मानाबाद जिल्ह्यातील तेरढोकी या गावचे होते. संत मंडळीमध्ये वयाने जेष्ठ असल्याने त्यांना 'काका' असे संबोधले जात असे. 'परब्रम्ह म्हातारा निवाला अंतरी वैराग्याचे वरी पाल्हळला' अशा शब्दात मुक्ताबाईने त्यांचा गौरव केला. गोरोबा आपल्या अभंगात असे म्हणतात,''अंतरीचे गुज बोलू ऐसे काही वर्ण व्यक्त नाही शब्द शून्य'' अत्यंत कमी शब्दात, उच्च दर्जाचा अध्यात्मिक अनुभव साकार केला असे वाटते. त्यांच्या अभंगाची संख्या कमी जरी असली तरी गुणांच्या बाबतीत ती श्रेष्ठ आहे.

**संत जनाबाई जीवन -**

जनाबाईंचा जन्म परभणी येथील गंगाखेड येथील दमा नावाच्या विठ्ठलभक्ताच्या घरी झाला. जनाबाईंच्या एका अभंगातील 'माझ्या वडिलांचे दैवत। तो हा पंढरीनाथ ।।' या ओळींवरून त्यांचे वडील दमा हेदेखील वारकरी असावेत, अशी शक्यता दिसते. त्यांच्या आईचे नाव करुंड. त्याही भगवद्भक्त होत्या. संत जनाबाई या संत कवयित्री म्हणून जनमानसात लोकप्रिय आहेत. महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातून स्त्रिया जात्यावर दळण दळताना, कांडताना त्यांच्या ओव्या गातात. बालपण गोदावरीच्या तीरावरील परभणी जिल्ह्यातील गंगाखेड हे जनाबाईंचे गाव होय. आई व वडील पंढरपूरच्या विठ्ठलाचे परमभक्त होते.

**संत ज्ञानेश्वर :-**

संत ज्ञानेश्वर यांचे जन्मगांव पैठण जवळील आपेगाव होय. त्यांनी ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, हरिपाठ आणि अभंग असे साहित्य लिहिले. ते आपल्या अभंगात लिहितात,

'' निर्जिव दगडाची काय करिसी सेवा
तो तुज निर्दैवा देईल काय ''

अशा अभंगातून त्यांनी कर्मकांडावर टिका केली आहे असे वाटते.

''म्हणोनि कुळ जातिवर्ण हे अवघेची गा अकारण''

या अभंगातुन विवेकनिष्ठ मानवतावादाचा विचार त्यांनी मांडला.

**संत एकनाथ:-**

संत एकनाथ हे पैठणचे होते. नाथांच्या आयुष्यात या षष्ठीला फार महत्त्व आहे. जनार्दन स्वामींचा जन्म, जनार्दन स्वामींना दत्ताचे दर्शन, नाथांना जनार्दन स्वामींचा अनुग्रह, जनार्दन स्वामींची समाधी आणि नाथांची समाधी या सगळया गोष्टी एका तिथीला झाल्या. नाथांनी संसार करून परमार्थ केला. नाथांचे एकनाथी भागवत ही भागवताच्या ११व्या स्कंदावरील टीका प्रसिद्ध आहे. ज्ञानेश्वरीची मूळ प्रत मिळवून ती शुद्ध करण्याचे काम एकनाथांनी केले. त्यांनी वारकरी संप्रदायाचे कार्य चालविण्याची जबाबदारी स्विकारली. नाथांनी चतु:श्लोकी भागवत, एकनाथी भागवत, रुक्मिणी स्वयंवर, भावार्थ रामायण, भारुडे, गवळणी, अभंग व पदे इत्यादी साहित्य त्यांनी लिहिली आहेत. नाथांच्या या भारुडातून विनोदात्मक नाट्य अभिव्यक्त केले आहे. त्यांनी सर्व समाज भक्तीच्या सुत्राने बांधला असे वाटते.

तुकाराम महाराज असोत वा अन्य कोणतेही संत असोत, ते केवळ शाब्दिक उपदेश करीत नव्हते. ते स्वत:च्या कृतीतून लोकांना उपदेश करीत होते. तुकाराम महाराजांनी स्वत:च्या मुलांसाठी घेतलेला उसाच्या कांद्या वाटेत भेटलेल्या दुसऱ्यांच्या लहान मुलांना वाटल्या, कारण त्यांना त्या लहान मुलांमध्ये स्वत:ची लहान मुले दिसली. याच तुकाराम महाराजांनी दुष्काळात घारेच्या घरे उपाशी तडफडू लागली तेव्हा स्वत:च्या घरातले धान्य लोकांना मुक्तहस्ते वाटून टाकले. ज्या काळामध्ये अस्पृश्यता उघडपणे पाळली जायची, जय काळात अस्पृश्याची सावली अंगावर पडली तरी उच्चवर्णीय लोक पाप झाले असे मनात असत, त्या काळात संत एकनाथांनी एका महाराच्या व्याकूळ होऊन रडणाऱ्या बाळाला कडेवर घेतले आणि त्याला त्याच्या घरी पोहचवले. या कृतीतून संत एकनाथांनी जातीयतेविरुद्ध बंड करण्याचा विचार मांडला होता.

संतानी भक्तीच्या क्षेत्रांत तरी जातीयतेला पूर्णपणे गाडले. म्हणूनच नामदेव शिंपी, सेना न्हावी, गोरा कुंभार, चोखामेळा, सावता माळी, बंका महार, संत कान्होपात्रा, संत जनाबाई, संत सखुबाई,संत भागुबाई, अशा विविध जातीजामातींतील व्यक्तींना संतपद प्राप्त झाले. तसेच पूर्वीच्या काळी भक्तिमार्ग हा जाचक कर्मकांडांनी व्यापला होता. त्यात सामान्यजनांना प्रवेश नव्हता. संतानी ही स्थिती उधळून लावली. साध्या नाम्स्म्रानानेही भक्ती करता येते, ही त्यांनी दाखवून दिले. संत सावता माळी यांनी कांदा-मुळा भाजी यात विठ्ठल सामावला आहे, असे भक्तिभावाने संतीतले. आपले दैनंदिन कामही निष्ठेने पर पाडण्यात परमेश्वराची भक्ती सामावलेली आहे, हेच त्यांनी दाखवून दिले.

**निष्कर्ष :-**

संताच्या अभंगात अध्यात्मिक उकल करण्याचे विचार आहेत. संत साहित्य जीवनानुभव व्यक्त करणारे आहे. सर्वसमावेशकता संताच्या अभंगात आहे. कर्मठपणा नाकारणारे आहे. संत साहित्यात व्यवहारीक प्रतिमेचा वापर करुन प्रचार व प्रसार केला गेला. साधी सरळ व सर्व सामान्य लोकांना समजेल अशा भाषेचा वापर केला. संतांनी एकतेचा व समतेचा संदेश दिला.

**संदर्भ सूची**

१] डॉ. दादा गोरे : आधुनिक भाषा, विज्ञान आणि मराठी भाषा, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्र.आ. १९९९
२] डॉ. सदाशिव सरकटे : मध्ययुगीन मराठी वाड.मयाचा इतिहास [आरंभ ते १८००], कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्र.आ. २०१५
३] संजय सोनवणी :विठ्ठलाचा नवा शोध, सुगावा प्रकाशन, पुणे प्र.आ. ऑक्टो. २००८
४] डॉ. प्रल्हाद लुलेकर : मराठवाड्यातील साहित्य, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्र.आ. २००७
५) संत तुकाराम गाथा: महाराष्ट्र शासन - प्रकाशन